**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुकुमार चवगोंडा पाटील
द्वारा श्री अण्णा गिरगोंडा पाटील,
धामणी रोड सांगली, जकात नाक्याजवळ,
ता.मिरज, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, जि. सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ०८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १२.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुकुमार चवगोंडा पाटील व्दारा श्री अण्णा गिरगोंडा पाटील,
धामणी रोड सांगली, जकात नाक्याजवळ, ता.मिरज, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,
सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
श्री. बाजीराव जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सहा आयुक्त,
सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
श्री. रमेश तु. वाघमारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १५.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २५.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १४.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १३.३.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सांगली येथील स.क्र. ३८८/४,५,६,३८८/२ व ३८६ मधील गुंठेवारी विकासदर व त्याचा विनियोग व लाभधारक या संदर्भात सर्व माहिती | |

## विवेचन

सांगली येथील स.क्र. ३८८/६ मध्ये रस्त्याच्या आरक्षणावर बांधकाम करणाऱ्यांना महानगरपालिकेने पाणी व इतर सुविधा देऊ नयेत आणि अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी, या विषयाच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री. सुकुमार चवगोंडा पाटील यांनी स.क्र. ३८६ व ३८८ मधील गुंठेवारी, विकास कर, त्याचा विनियोग व लाभधारक या संबंधीची माहिती मागितली होती. माहिती अपुरी व चुकीची दिल्याच्या कारणावरुन श्री. पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून श्री. पाटील यांचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित अनधिकृत बांधकाम धारकांना पाणी जोडणी व इतर सुविधा देण्यात आल्या आहेत. सुमारे ८ वर्षे आपण या बेकायदेशीर बांधकामाचा विषय महानगरपालिकेकडे मांडत आहोत, परंतु अतिक्रमण करुन केलेली ही बांधकामे काढण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला असतानाही त्याची अंमलबजावणी केली जात नाही. कायद्याने नागरी सुविधांना पात्र असलेल्या नागरिकांना सुविधा दिल्या जात नाहीत, मात्र महानगरपालिकेने बेकायदेशीर ठरविलेल्या बांधकामांना कोणत्या

नियमानुसार व कोणत्या अधिकारात सुविधा पुरविण्याला जात आहेत, हे नागरिकांना कळले पाहिजे, असे प्रतिपादन श्री. पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. गुंठेवारी प्रस्ताव न करताही अतिक्रमण करणाऱ्यांना राजकीय दबावाखाली सोई-सवलती पुरविल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आपण मागितलेली माहिती (पाईप लाईन टाकण्याच्या निविदा वगैरे) दिली नाही, असे श्री. पाटील यांनी नमूद केले. ही माहिती श्री. पाटील यांना देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात दिले होते, त्यानुसार श्री. पाटील यांना ती देण्यात आली आहे. दहा लाख रुपयांपर्यंतची (तातडीची) कामे आयुक्तांना स्वतःच्या अधिकारात करता येतात. त्यानुसार काम केले असल्यामुळे निविदा आदीचा प्रश्न आला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी नमूद केले.

तत्कालीन प्रभारी जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. पाटील यांच्या सर्व मुद्दयांचे विहित मुदतीत उत्तर दिले आहे. परंतु पाण्याची सुविधा विकास कर भरुन न घेता किती लोकांना / भूखंड धारकांना दिली आहे, (याचाच अर्थ बेकायदेशीरपणे दिली आहे ), या मुद्दयाचे जन माहिती अधिकाऱ्यांनी संदिग्ध उत्तर दिले आहे. ती माहिती नेमकेपणाने दिली जाणे आवश्यक आहे.

स. क्र. ३८८ ही नागरी समूहात येणारी जमीन असून गुंठेवारीत घेतलेले भूखंड नियमित केले आहेत. १९८४ साली विकास आराखडा मंजूर झालेला आहे, त्यात ८० फुटी रस्त्यासाठी आरक्षण केलेले आहे. या आरक्षित जागेवर विनापरवाना घरे बांधण्यात आली असून महानगरपालिकेने ते अतिक्रमण ठरविलेले आहे. नियमित झालेल्या बांधकामांना रस्ता उपलब्ध नाही. या रस्त्याच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांना मात्र नागरी सुविधा पुरविल्या जात आहेत, असे श्री. पाटील यांनी स्पष्टपणे नमूद केले. उपस्थित अधिकारी त्याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या व उत्तरदायित्वाच्या कारभाराशी हे विसंगत आहे. नागरिकांच्या न्याय्य हक्कानुसार त्यांना लाभ प्राप्त झाले आहेत की नाही, याची माहिती मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे. त्यानुसार अर्जावरील कार्यवाही बाबतची नेमकी माहिती नागरिकांना देण्याची दक्षता सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख म्हणून महानगरपालिका आयुक्त यांनी घेतली पाहिजे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. पाण्याची सुविधा, स.क्र. ३८६ व ३८८ मधील बेकायदेशीर भूखंड धारकांना दिलेल्या पाणी जोडणी संबंधीची माहिती अपीलकर्त्यास त्वरित देण्यात यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १०.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. उपरोक्त वसाहतीमधील नागरिकांना न्याय्य हक्कानुसार प्राप्त होणे आवश्यक असलेल्या नागरी सुविधांबाबतची वस्तुस्थिती व महानगरपालिकेने अतिक्रमण ठरविलेल्या घरांबाबतची कार्यवाही; त्यांना पुरविल्या जाणाऱ्या नागरी सुविधा यांबाबतची वस्तुस्थिती याची नेमकी, निःसंदिग्ध व संपूर्ण माहिती सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून आयुक्तांनी दि. १५.२.२००८ पर्यंत द्यावी. तसा पूर्तता अहवाल आयोगाला दि. २०.२.२००८ पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. ३०.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय भगवान अहिर,
मु.पो.ता. वाळवा, जि. सांगली. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इस्लामपूर,
ता. वाळवा, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी ,
मंडल अधिकारी कार्यालय, वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १० / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/९/२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय भगवान अहिर, मु.पो.ता. वाळवा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इस्लामपूर, ता. वाळवा, जि.सांगली
श्री.व्ही.पी.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी , मंडल अधिकारी कार्यालय, वाळवा,
जि. सांगली तत्कालीन श्री.पी.जी.उरकुडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/२/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/३/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३/३/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २/५/२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>जिल्हाधिकारी यांचेकडील दि.१९.१२.१९९५ क्र.माशा/३/ह.नो./आरआर/२१७१/९५, आणेवारीने खरेदी केलेल्या जमिनीच्या नोंदीबाबत तहसीलदार, वाळवा यांच्याकडील क्र.हनो/वशी/१४२/९४, दि.१९.१.२००४ रोजी नोंदीबाबत वरील परिपत्रकानुसार सहहिस्सेदाराना दिलेल्या नोटिसा, हरकत नसलेचे लेखी निवेदन दिले असल्यास किंवा हितसंबंधित व्यक्ती , त्याची नोटीस दिली असल्यास छायांकित प्रती |
|---|---|

## विवेचन

जमीन खरेदीच्या संदर्भातील सहहिस्सेदाराला दिलेली नोटीस व त्यांचे ना हरकत पत्र यांच्या प्रती अपीलकर्ता श्री.संजय भगवान अहिर यांनी मागितली होती. त्यासंबंधित नोटीसबुक गावकामगार तलाठी, वाळवा यांनी तहसील कार्यालय, वाळवा, इस्लामपूर यांच्याकडे जमा केले असल्याने व मागणी तलाठी कार्यालयाकडील तलाठी कार्यालयाशी संबंधित असल्याकारणाने पुरविता आली नाही, असे नमूद करुन मंडल अधिकारी, वाळवा यांनी अर्ज निकाली काढला. त्याविरुध्द श्री.अहिर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इस्लामपूर, ता.वाळवा यांच्याकडे अपील केले. तहसीलदारांनी त्याची दखल घेतली नाही. त्याबाबत श्री.अहिर यांनी तहसीलदारांना स्मरणपत्र दिले. त्यावर संबंधित माहिती तलाठी कार्यालयाशी निगडीत असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वाळवा यांनी कळवून अर्ज निकाली काढला. त्यानंतर श्री.अहिर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.अहिर यांना आवश्यक असलेली माहिती तलाठी कार्यालयाशी संबंधित असल्यास मंडल अधिकाऱ्यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पाच दिवसात हा अर्ज गावकामगार तलाठी यांच्याकडे वर्ग करुन तसे आपल्याला कळविणे आवश्यक होते. त्यांनी तसे केले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलाची सुनावणी न करता त्यांचेकडील अपिलाला निवासी नायब तहसीलदार यांनी उत्तर दिले व त्यांनीही संबंधित तलाठ्याकडे

अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. नोटीसबुक तहसील कार्यालयाकडे जमा म्हणून प्रत देता येत नाही असे गावकामगार तलाठ्यांनी अपीलकर्त्याचे बंधू श्री.अंकुश भगवान अ यांना पत्राद्वारे कळविले. ही सर्व कायद्याची पायमल्ली असून याबाबत संबंधितांवर शास्ती कार्यवाही व्हावी, असे निवेदन श्री.संजय भगवान अहिर यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

श्री.अहिर यांनी केलेले प्रथम अपील कार्यालयाकडून गहाळ झाले. स्मरणपत्रावर गावकामगार तलाठी यांनी उत्तर दिले ही चूक झाली. राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाच्या सुनावणीची नोटीस मिळाल्यानंतर प्रथम अपिलाची कल्पना आली व सुनावणी दि.६.९.२००७ ला घेतली व दहा दिवसात माहिती देण्याचा आदेश दिला, असे तहसीलदार श्री.व्ही.पी.पाटील यांनी निवेदन केले.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार श्री.अहिर यांचा अर्ज पाच दिवसात संबंधित तहसीलदार कार्यालयाने संबंधित गावकामगार तलाठी यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. अर्जदाराने तशी लेखी कल्पना दिल्यानंतरही मंडल अधिकारी, अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वाळवा यांनी तशी कार्यवाही केली नाही. तसेच निवासी नायब तहसीलदार व गावकामगार तलाठी यांनीही माहिती देण्याचा प्रयत्न करण्याऐवजी टोलवाटोलवी केली आहे, असे कागदपत्रांवरुन स्पष्ट दिसते. दि.१६.९.२००७ पर्यंत आपण माहिती देऊ, असे तत्कालीन मंडल अधिकारी श्री.पी.जी.उरकुडे व तहसीलदार श्री.व्ही.पी.पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीच्या वेळी सांगितले. हितसंबंधित व्यक्तींना द्यावयाच्या छायांकित प्रती गावकामगार तलाठी, वाळवा यांनी दिली, मात्र सहहिस्सेदारांना नोटीस बजावण्यात आलेली नाही, असे त्यांनी उत्तरात नमूद केले आहे. सहहिस्सेदारांना नोटीस न देताच गावकामगार तलाठी यांनी फेरफार नोंद करुन जिल्हाधिकारी, सांगली यांच्या दि.२९.१२.१९९५ च्या आदेशाचा भंग केला आहे हे स्पष्ट होते, असे श्री.अहिर यांनी आयोगाला दि.२२.९.२००७ रोजी पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे. हे लक्षात घेता माहिती जाणीवपूर्वक डावलली गेली असे दिसून येत आहे. त्यामुळे तत्कालीन गावकामगार तलाठी श्री.अमर साळुंखे, तत्कालीन मंडल अधिकारी श्री.पी.जी.उरकुडे, निवासी नायब तहसीलदार श्री.बिराजदार दोषी व शास्तीस पात्र ठरतात. तसेच सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख म्हणून तहसीलदारही जबाबदार ठरतात.

वरील बाबी विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) तत्कालीन गावकामगार तलाठी श्री.अमर साळुंखे, तत्कालीन मंडल अधिकारी श्री.पी.जी.उरकुडे, निवासी नायब तहसीलदार श्री.बिराजदार यांनी माहिती हेतूत: डावलल्यामुळे व कायद्याचे पालन न केल्यामुळे रु. २५०००/- शास्ती सर्वांना मिळून लावण्यात येत आहे. माहे फेब्रुवारी देय मार्च महिना या पगारातून सदर शास्ती वसूल करून दि. १५.३.२००८ पर्यंत पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा. अपिलीय प्राधिकारी नायब तहसीलदार यांची ही जबाबदारी राहील.

(३) तहसीलदार, वाळवा श्री.व्ही.पी.पाटील यांनी अपिलाबाबत गांभीर्याने हाताळणी केलेली नाही व अपिलाच्या सुनावणीबाबत केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचे पालन केलेले नाही. त्याबद्दल त्यांना कडक समज देण्यात येत आहे.

वरील आदेश क्र. २ व ३ ची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.३.२००८ पर्यंत सादर करावा. ही जबाबदारी उपविभागीय अधिकारी, वाळवा उपविभाग, इस्लामपूर, जि.सांगली यांची राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि. २३/१/२००८

प्रत:: उपविभागीय अधिकारी, वाळवा उपविभाग, इस्लामपूर, जि.सांगली यांना योग्य त्या कारवाईसाठी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विकास भीमराव गायकवाड
मु. पो. वडापुरी, ता. इंदापूर, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कार्यकारीअभियंता, खडकवासला
सिंचन भवन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४१ /पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १८.५.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २६.६.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २६.७.२००७ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>आपल्या कार्यालयामार्फत करण्यात येणाऱ्या विकास कामांची माहिती (उदा. वर्क ऑर्डर, कामांची नावे, ठिकाणासह इत्यादी ) | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विकास भिमराव गायकवाड यांनी पाटबंधारे विभागाकडील काही कामांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, खडकवासला,सिंचन भवन, पुणे व अपीलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री.गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने दि.२३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली असता अपीलकर्त्याने माहिती अधिकारांतर्गत मागविलेली माहिती आपणास प्राप्त झालेली असल्याने आपले दि. २१.०८.२००७ रोजीचे अपील निकाली काढण्याबाबत दि. ३१.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे.

सबब आयोग पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९.०१.२००८**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नरेश विष्णू डहाणूकर
५८७, बुधवार पेठ, पुणे-२

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग १, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. १ पुणे
तहसीलदार कचेरी आवार, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७५ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २९.६.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १७.७.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ३१.७.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सदाशिव पेठ येथील सिटी सर्व्हे क्र. ११५९ या मिळकतीबाबत दस्त क्र. ५३४७ /९४८ ची सत्य प्रत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नरेश विष्णू डहाणूकर यांनी सह दुय्यम निबंधक, हवेली, क्र.१ यांच्या कार्यालयातील नोंदणीकृत दस्त क्र. ५३४७/१९९४ दि. १७.१०.१९९४ च्या मूळ दस्ताची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री.डहाणूकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडील अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने दि. २०.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. आपल्याला मूळ दस्त मिळाल्याने या अपिलाबाबत आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे आपले अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याचे निवेदन सह दुय्यम निबंधक, हवेली १, पुणे यांनी दि. ३१.१.२००७ रोजीच्या पत्रासोबत आयोगाला पाठविले असून सदर अपील निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे .

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ११.१.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती युमुना बापू भोई,
शासकीय रुग्णालयाजवळ,
तासगाव, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/९/२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती यमुना बापू भोई, शासकीय रुग्णालयाजवळ, तासगाव, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सातारा तर्फे
प्रतिनिधी श्री.विवेक आगवणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा श्री.प्रल्हाद एन.हिरामणी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५/१/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४/२/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/२/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०/३/२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सर्व प्रकारचे फॉर्मस व कागदपत्र, प्रमाणपत्र देऊनही माझ्या पतीचे कुटुंब निवृत्ती वेतन व भविष्य निर्वाह निधी व इतर सुविधा आजअखेर मिळाल्या नाहीत, संबंधित कार्यालयाकडून काही कागदपत्र, सेवापुस्तक सापडत नाहीत यात अर्जदार दोषी आहे का? कागदपत्रे आढळून आली नाहीत तर आपली पुढील कार्यवाही व कार्यपध्दत काय? पेन्शन व सुविधा मिळणेस किती कालावधी लागेल ? |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती यमुनाबाई बापू भोई यांनी आपल्या पतीचे कुटुंब निवृत्ती वेतन व भविष्य निर्वाह निधी या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागितली होती. दोन वेगवेगळ्या अर्जांद्वारे त्यांनी मागितलेल्या माहितीनुसार संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तरे दिली. या उत्तरात अपिलीय प्राधिकाऱ्यांची माहिती दिली नसल्यामुळे श्रीमती भोई यांनी विभागीय आयुक्तांकडे अपील केले. तेथून ते अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे पाठविण्यात आले.

श्रीमती भोई या सन २००४ सालापासून हा विषय विविध अर्जांद्वारे व विविध अधिकाऱ्यांपुढे मांडत आल्या असून त्याना वेळोवेळी प्रशासकीय उत्तरे देण्यात आली आहेत. त्याचा संदर्भ देऊन प्रशासकीय स्वरुपाची उत्तरे माहिती अधिकारांतर्गत अर्जांवर श्रीमती भोई यांना देण्यात आली. श्रीमती भोई यांच्या वतीने त्यांचे चिरंजीव डॉ.सचिन बापू भोई (खंडागळे) यांनी विविध अधिकाऱ्यांकडे या विषयाचा पाठपुरावा करीत आले आहेत. राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीतही श्रीमती भोई यांची बाजू त्यांनी मांडली. श्रीमती भोई उपस्थित होत्या. परंतु प्रकृती बरी नसल्याने त्या बोलू शकत नाहीत, असे डॉ.सचिन बापू भोई (खंडागळे) यांनी सांगितले.

पतीचे कुटुंब निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी व इतर सुविधा आपल्याला का मिळत नाहीत, असा श्रीमती भोई यांचा मुख्य प्रश्न आहे. कै.बापू भोई हे सन १९४४ साली शासकीय सेवेत आले. सन १९५९ सालापर्यंत पुरवठा शाखेशी ते संबंधित होते. सन १९६५ साली त्यांना बडतर्फ

करण्यात आले अशी माहिती मिळते, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सातारा यांचे प्रतिनिधी श्री. विवेक आगवणे व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, सातारा श्री. प्रल्हाद एन. हिरामणी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. कै.बापू भोई यांचा सेवाविषयक तपशील असलेले व सतत तीन वर्षे गैरहजर राहिल्यामुळे जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांना दि.१८.३.१९६५ च्या आदेशान्वये सेवेतून कमी करुन काढून टाकल्याचे टिपण आढळल्याचे या अधिकाऱ्यानी सांगितले व त्याची छायांकित प्रत सादर केली. मात्र स्वाक्षरी नसल्यामुळे हा कागद विश्वासार्ह धरता येणार नाही, असे प्रतिपादन श्री.भोई याचे चिरंजीव डॉ.सचिन बापू भोई(खंडागळे) यांनी केले. कै.बापू भोई सेवेतून बडतर्फ झाले असल्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरत नाही, त्यामुळे त्यांच्या निवृत्तीवेतनाचा प्रस्ताव महालेखापाल, मुंबई यांच्याकडे सादर करता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.प्रल्हाद हिरामणी यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. कै.भोई सन २००३ पर्यंत हयात होते. गेल्या ४० वर्षात त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वारसांनी देखील सेवा समाप्तीनंतरच्या निवृत्तीवेतन आदि लाभांबाबत अर्ज केलेला नाही याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

कै.भोई यांचे मूळ सेवापुस्तक न मिळणे हा आपला दोष नसून ते उपलब्ध करुन देणे ही संबंधित कार्यालयाची जबाबदारी आहे. आपण आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर केली आहेत, असे डॉ.सचिन बापू भोई(खंडागळे) यांनी नमूद करुन महालेखापाल कार्यालयापासून विविध कार्यालयांशी केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती दिली. भविष्य निर्वाह निधीची रक्कम प्रयत्नपूर्वक मिळवून आपण देऊ केली, परंतु ती घ्यावयास अर्जदार तयार नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.प्रल्हाद हिरामणी यांनी केले. मात्र ही रक्कम अत्यल्प (रुपये २११९ ) असून त्यावरील व्याजासह व सध्याच्या प्रचलीत दरानुसार ती रक्कम मिळाली पाहिजे, असा दावा डॉ.भोई यांनी केला.

तत्कालीन लिपिक व सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी श्री.व्ही.के.देशपांडे व वाई तहसील कार्यालयातील तत्कालीन लिपिक व सेवानिवृत्त तहसीलदार श्री.के.टी.साळुंखे हे त्यावेळी कै. भोई यांच्या विषयाशी संबंधित होते, ते याबाबतची माहिती देऊ शकतील, असे जन माहिती अधिकारी व

अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. आयोगाने त्यास मान्यता दिली. श्री. देशपांडे व श्री. साळुंके यांनी दि.१३.९.२००७ रोजी सातारा येथे आयोगापुढे उपस्थित राहून स्मरणानुसार लेखी व तोंडी निवेदन सादर केले. श्री.देशपांडे (१९९४-१९८२) हे सन १९६२ ते १९६५ या काळात खातेनिहाय कारवाईची प्रकरणे हाताळत होते. विनापरवाना गैरहजर राहिल्याबद्दल नोकरीतून कमी करण्यात आले, अशा प्रकारचे कै. बापू भोई यांचे एकच प्रकरण असल्यामुळे आपल्या ते लक्षात राहिले, असे श्री.देशपांडे यांनी नमूद केले.

आपल्या वडिलांच्या संबंधित सेवाकाळाच्या वेळी आपण बालवयात होतो, तसेच वडिलांचे व आईचे आजारपण यामुळे आपल्याला त्यांच्या निवृत्तीबाबतचा तपशील माहिती असणे शक्य नाही, मात्र शक्य तेवढी कागदपत्रे सादर करण्यातही सरकारकडील कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे श्रीमती यमुना भोई यांच्यावर अन्याय होतो आहे, असे प्रतिपादन डॉ.सचिन बापू भोई(खंडागळे) यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व संबंधित कागदपत्रे लक्षात घेता श्रीमती भोई यांची मूळ मागणी कुटुंब निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी आदी मंजूर करण्याच्या कार्यवाहीबाबतची आहे. सुमारे ४० वर्षांपूर्वीची कागदपत्रे आपण अनेक ठिकाणी तपासूनही आढळत नसल्याचे व श्रीमती भोई यांच्याकडे जी मूळ (विशेषतः मूळ सेवापुस्तक) कागदपत्रे असतील ती उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.प्रल्हाद हिरामणी व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.विवेक आगवणे यांनी लेखी व तोंडी सातत्याने नमूद केले आहे. कार्यवाहीचा विषय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. अन्य अभिलेखांचा शोध घेण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे श्रीमती यमुना बापू भोई व डॉ.सचिन बापू भोई(खंडागळे) यांनी मूळ सेवापुस्तक आदि कागदपत्रे असल्यास व सादर करावयाची राहिली असल्यास संबंधित अधिकाऱ्यांना पुरविणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी या संदर्भात महालेखापाल, भरतीय लेखा परीक्षा (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई भविष्य निर्वाह निधी शाखा यांच्याशी सन २००५ पासून पत्रव्यवहार केला आहे. कै. बापू भोई यांच्या सेवा समाप्तीबाबतचा तपशील दि.३१.१०.२००७

पर्यंत शोध घेऊन कळवावा, असे आदेश आयोगाने दिल्याचे महालेखापाल कार्यालयाला कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दि. २१.९.२००७ च्या पत्रात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य

२. कै.बापू भोई यांची सेवा नेमकी कोणत्या कारणासाठी, कोणत्या ठिकाणी व कोणत्या दिनांकाला समाप्त झाली याबाबतच्या अभिलेखाचा दि.३१.१०.२००७ पर्यंत शोध घेऊन अहवाल सादर करण्याच्या सूचना आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिल्या होत्या. त्याचा पूर्तता अहवाल दि.३०.१.२००८ पर्यंत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, सातारा श्री. प्रल्हाद एन. हिरामणी व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सातारा यांनी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. १८.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. शिवाजी आनंदा कापसे
सचिव, वरदान संस्था, मु.पो. रेठरेधरण,
ता. वाळवा, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/९/२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिवाजी आनंदा कापसे, सचिव, वरदान संस्था, मु.पो. रेठरेधरण, ता. वाळवा, जि. सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली
डॉ. एल. एस.साळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/३/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-यानं उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/४/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८/४/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१.डॉक्टर व कर्मचारी दवाखान्यामध्ये मुक्कामाला राहतात का, वेळेवर हजर राहतात का, वेळेवर कामावर हजर राहत नसतील त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येते,तसेच सुधारणा करण्यासाठी कोणते प्रयत्न करणार आहात.<br>२.शासनाने कर्मचारी व डॉक्टर यांच्या कामाच्या वेळा, नियम व अटी याबाबत काढलेल्या शासन निर्णयाची प्रत, त्याप्रमाणे न वागणाऱ्यावर किती दिवसात कारवाई करणार, आरोग्य केंद्रात सुधारणा करण्यासाठी व चांगली सेवा देण्यासाठी लेखी हमी द्यावी, आपण सहकार्य केल्यास आरोग्य केंद्रातील गैरकारभार दाखवू शकतो, आमच्या भेटीवेळी आपण हजर राहावे, आम्ही हजेरीपुस्तक व रजिस्टर पाहू शकतो का, नसेल तर त्याबाबत शासन निर्णयाची प्रत द्यावी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे महिन्याच्या कामाचे वेळापत्रक लोकांना दिसेल असे लावावे.<br>३.श्री.कुंभार, आरोग्य सहाय्यक यांच्या कामाची सविस्तर माहिती, महिन्याचे कामाचे वेळापत्रक, दिलेल्या ठिकाणी असतात का, नसतील तर त्यांच्यावर कोणती कारवाई करणार<br>४.प्रत्येक कर्मचारी व डॉक्टर यांचे नांव, कामाचे स्वरुप /नेमून दिलेल्या ठिकाणी, वेळी आहे का, कामावर येताना जाताना सही करुन वेळ लिहावी असे असावे की नको याबद्दलचे आपले स्वत:चे मत काय आहे,<br>५.प्रत्येक कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्र, पेठ येथे रुजू झालेली तारीख, किती वर्षे कामाला आहेत याची माहिती, स्वच्छ व पारदर्शक व भ्रष्टाचारविरहित काम करण्यासाठी आपणाकडून कोणते उपाय केले जाणार. |
|---|---|

## विवेचन

जिल्हा आरोग्य कार्यालयामधील व प्राथमिक आरोग्य केंद्रातील कामकाजाच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.शिवाजी आनंदा कापसे यांनी माहिती मागितली होती. श्री.कापसे हे वुमेन रिसर्च डेव्हलपमेंट नेटवर्क (वरदान) संस्था, मु.पो.रेठरे धरण, ता.वाळवा जि.सांगली या संस्थेचे सचीव आहेत. सर्वेक्षणासाठी पेठ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेलो असता आपल्याला सहकार्य मिळाले नाही असे नमूद करुन त्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक व लेखी स्वरुपाची माहिती श्री.कापसे यांनी मागितली आहे. त्याबाबत समाधानकारक उत्तर न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे अपील केले. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल न घेतल्यामुळे श्री.कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आरोग्य विभागामार्फत जनतेसाठी शासन कोट्यावधी रुपये खर्च करते, परंतु अधिकारी व कर्मचारी योग्य प्रकारे काम न करता जनतेचे व शासनाचे नुकसान करतात, म्हणून आपण संघर्ष करीत असून माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्ज व अन्य प्रयत्न हा त्याचाच एक भाग आहे, असे श्री.कापसे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. दोषी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करणार, सुधारणा करण्यासाठी कोणते प्रयत्न करणार, गैरप्रकार दाखविण्याची तयारी असल्यास आम्हांला कोणते सहकार्य करणार, स्वच्छ, पारदर्शक व भ्रष्टाचारविरहित काम करण्यासाठी आपणाकडून कोणकोणते उपाय केले जाणार अशा स्वरुपाचे प्रश्न माहितीच्या अधिकारा अंतर्गत त्यांनी विचारले आहेत.

गृहित गोष्टींवर आधारीत अशा स्वरुपाची ही मागणी आहे, त्यामुळे माहिती म्हणून त्याबाबतची उत्तरे देणे अपेक्षित नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली डॉ.एल.एस.साळे यांनी केले. श्री.कापसे यांनी सादर केलेले बहुसंख्य अर्ज व निवेदने या स्वरुपाचीच आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी जागेवर नसतात, पूर्ण वेळ काम केले जात नाही, नियमित नोंदी ठेवल्या जात नाहीत. त्यामुळे नागरिकांना योग्य प्रकारे आरोग्य सेवा मिळत नाही, म्हणून आपण तपासणी करण्याचे प्रयत्न केले असता ती करु दिली जात नाही, कर्मचारी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष श्री.एस.एस.कुंभार हे आरोग्य कर्मचारी असून संघटनेच्या बळावर व अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरप्रकारांना पाठीशी घातले जाते. त्याबाबत चौकशी व्हावी, अशी मागणी श्री.कापसे यांनी केली. अर्जदार श्री.कापसे व भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन संघटनेचे प्रतिनिधी केव्हाही येऊन कर्मचाऱ्यांना कोणत्याही गोष्टीबाबत विचारणा करतात, खुलासे मागतात, तपासणी करु पाहतात, त्यामुळे कर्मचाऱ्यांना कामे करताना अडचणी येतात व त्रास होतो, अशा स्वरुपाच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी असल्याचे डॉ.एल.एस.साळे यांनी सांगितले. त्या संदर्भात पोलिसांकडे तक्रारी करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाची वाळवा तालुका शाखा रद्द झाल्यामुळे ते नांव वापरले जात नाही. डॉ.साळे म्हणतात त्या तक्रारी खऱ्या नाहीत, गैरप्रकार उजेडात येऊ नयेत म्हणून अशा प्रकारच्या सबबी सांगितल्या जातात, असा प्रतिवाद श्री.कापसे यांनी केला.

श्री.कापसे यांनी 'माहिती ' म्हणून कार्यवाहीचे मुद्दे, भाष्यात्मक स्वरुपाचे स्पष्टीकरण इत्यादींची मागणी प्रामुख्याने केली आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत ते येत नाही. मात्र शुल्क भरुन घेऊन त्यांना माहिती दिली गेल्याची पोच उत्तरवादी यांचेतर्फे सादर करण्यात आली.

श्री.कापसे यांनी उपस्थित केलेले मुद्दे महत्त्वाचे असले तरी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येणारी माहिती या मर्यादेतच त्याचा विचार करावा लागेल. त्यामुळे शास्ती अथवा संबंधित अधिकाऱ्यांवरील कारवाई या मागण्या स्वीकारार्ह मानता येणार नाहीत. मात्र कर्मचाऱ्यांची उपस्थिती, कामाच्या नोंदी, दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा यांची माहिती अपीलकर्त्याला आवश्यक असल्यास ती दिली जाणे, तसेच सार्वजनिक अभिलेखाचे निरीक्षण करण्याची मागणी असल्यास त्याची पूर्तता करणे याची जबाबदारी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची राहते, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेणे बंधनकारक आहे, याची जाणीव संबंधित अधिकाऱ्यांना असणे आवश्यक आहे.

उभय बाजूंचे निवेदन व संबंधित कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. २४/१/२००८**